म्हाडा
MHADA

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)**

**जनसंपर्क विभाग**

=====================================================================

जा.क्र. जसंवि/प्रसिद्धी पत्रक / १४३७/ २०२०                                         दि. ०५/१०/२०२०

**प्रसिद्धी पत्रक**

# 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' मोहिमेअंतर्गत म्हाडा कर्मचाऱ्यांसाठी आयोजित विनामूल्य कोविड -१९ चाचणी शिबिराला प्रारंभ

मुंबई, दि. ०५ ऑक्टोबर, २०२० :- 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' या मोहिमेअंतर्गत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने 'म्हाडा'तील अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आयोजित कोविड-१९ विषाणू चाचणी शिबिराला मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर यांच्या हस्ते आज प्रारंभ करण्यात आला.

'म्हाडा'च्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात तळ मजल्यावरील महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेच्या कार्यालयात दि. ०९ ऑक्टोबर, २०२० पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चालणाऱ्या या शिबिरात आज पहिल्याच दिवशी सुमारे १७० अधिकारी- कर्मचाऱ्यांची चाचणी करण्यात आली.

यावेळी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. योगेश म्हसे, 'म्हाडा'चे मुख्य अभियंता-१ श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुंबई मंडळाचे सहमुख्य अधिकारी श्री. जीवन गलांडे, वित्त नियंत्रक श्री. विकास देसाई, विधी सल्लागार श्री. पी. बी. वीर, मुख्य वास्तुविशारद श्री. पी. बी. साळुंखे, मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. संजय कुमार वर्मा, सचिव श्री. राजकुमार सागर, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेचे श्री. मधुकर विचारे, श्री. मोहन कोळी, म्हाडा मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे श्री. एस. के. भंडारे आदींसह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यावेळी श्री. घोसाळकर यांच्यासह उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी कोविड चाचणी करून घेतली.

या शिबिरात म्हाडाच्या मुंबईस्थित सुमारे १३०० कर्मचाऱ्यांची व विनामूल्य कोविड चाचणी केली जाणार आहे. म्हाडा कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त सुरक्षा रक्षक , कंत्राटी कर्मचारी यांचीही या शिबिरात अँटीजेन आणि आवश्यकतेनुसार आरटी-पीसीआर चाचणी करण्यात येणार आहे. एखाद्या कर्मचाऱ्याचा कोविड चाचणी अहवाल पॉझिटिव्ह आल्यास त्यांच्या कुटुंबीयांचीही विनामूल्य चाचणी केली जाणार आहे.

या शिबिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करून देण्यात आलेले एच पूर्व विभागाचे डॉक्टर व प्रशिक्षित कर्मचारी यांचे पथक म्हाडातील कर्मचाऱ्यांची कोविड चाचणी करणार आहेत. सदरील पथक कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासंदर्भात कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणार असून जे अधिकारी - कर्मचारी पॉझिटिव्ह आढळतील त्यांना पालिकेच्या कोविड सेंटर्समध्ये तसेच म्हाडातर्फे उभारण्यात आलेल्या कोविड सेंटर्समध्ये प्रवेश मिळवून देण्याकरिता मार्गदर्शन आणि सहाय्य करणार आहेत. कोविड चाचणी पॉझिटिव्ह आलेल्या अधिकारी - कर्मचारी यांना शासनाच्या कोविड-१९ रुग्ण प्रोटोकॉलनुसार निर्देश दिले जाणार आहेत. कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्याकरिता अधिकाधिक कर्मचाऱ्यांनी या शिबिरामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन म्हाडा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

वैशाली गडपाले,
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा.


लवकर करु तपासणी
लवकर करु उपचार,
करु कोरोनाला हद्दपार




लवकर करु तपासणी
लवकर करु उपचार,
करु कोरोनाला हद्दपार

